# <u>मुक्त</u>

शक्ती तू नि मी शिव
भक्ती तू नि मी भाव
माझ्यात तुझा जीव
तुझ्यात माझे विश्व ||१||

आपसात गुंतले
तनमनच नव्हे
उभय प्राण आत्मे
जणू एकच झाले ||२||

कोठे माया माधव
सरले मी तू पण
संपले आपोआप
भक्त भक्ती देव ||३||

– नारायण
१०/२३/२३